PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 5, ISSUE 2

# वैश्विक महामारी (कोविड १९) मुळे महिलाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेल्या भविष्यविषयक शैक्षणिक चिंताचे चिकित्सक अध्ययन

**डॉ. गणेशकुमार पेटकर**
सहयोगी प्राध्यापक
जनता शिक्षण महाविद्यालय चंद्रपूर
**महाराष्ट्र भारत**.

**सारांश** :

कोविद – १९ मुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेल्या भविष्यविषयक शैक्षणिक चिंताचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणावर आढळून येते. प्रत्येक विद्यार्थी जवळपास चिंताग्रस्त आहे. पुढे काय होणार हे निश्चित नसल्यामुळे आणि योग्य शैक्षणिक धोरणांच्या अभावामुळे महाविद्यालयीन विद्यार्थी आज भविष्याबाबत चिंताग्रस्त आहे. परिक्षा होणार किंवा नाही हे सुद्धा कोणीही ठामपणे सांगू शकत नाही. केंद्र आणि राज्य सरकारच्या वेगवेगळ्या धोरणांमुळे विद्यार्थ्यांच्या चिंतामध्ये भरच पडली आहे असे दिसून येते.

**कळ शब्द** :– शैक्षणिक चिंता, महाविद्यालयीन विद्यार्थी

**प्रास्ताविक** :

२०२० चा सूर्योदय झाला तोच मुळी एक भयाण आजार घेऊन. ज्याच्या बाबत काहिच निश्चित माहिती नव्हते तसेच, ज्यावर कोणताही इलाज उपलब्ध नाही अशा कोविद – १९ या महामारीने २०२० ची सुरूवात झाली. सुरूवातीपासून याचे स्वरूप इतके भयाण होते की याचा प्रत्यक्ष परिणाम समाजातील सर्वच घटकावर झाला. ऐन परिक्षेच्या महत्वपूर्ण कालावधीमध्ये शाळा, महाविद्यालये बंद करावी लागली आणि विद्यार्थ्यांच्या मनात भविष्यात काय होणार याची चिंता सतावू लागली. विद्यार्थी परिक्षेची तयारी तर करीत होता आणि आहे परंतु आजही हे ठामपणे कोणी सांगू

शकत नाही की विद्यार्थ्यांची परिक्षा होणार किंवा नाही. जर परिक्षा न घेता अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना पदव्या देण्यात आल्या तर या विद्यार्थ्यांना नोकरी कोण देणार हा प्रश्न निर्माण होतो आहे. आज संपूर्ण जगातच हा प्रश्न निर्माण झालेला आहे. विद्यार्थी कधी नव्हे इतका भविष्याबाबत अनिश्चित झालेला आहे. परिक्षा, निकाल तसेच नविन सत्राची सुरूवात ह्या सर्व गोष्टींची वेळ कधिचीच मागे पडली आहे. जून, जुलै आणि आता ऑगस्ट महिना येतो आहे. परंतु याबाबत अजूनही अनिश्चिततेचे ढग पसरलेले आहेच. त्यामुळे सगळीकडे एक चिंताग्रस्त वातावरण तयार झालेले आहे. शाळा, महाविद्यालये ओस पडलेली आहे. जुलै महिण्यात विद्यार्थ्यांच्या आगमनाने फूलणाऱ्या शाळा, महाविद्यालयांना भकास स्वरूप प्राप्त झालेले आहे. कुणीच काही निश्चित सांगू शकत नाही की पुढे काय होणार आहे. त्यामुळे विद्यार्थीच नाही तर शिक्षक, पालक हे सर्वच घटक आज एका वेगळ्याच चिंतेने ग्रासले आहे. प्रत्येक पालक आपल्या मुलांच्या भविष्याबाबत चिंतेत आहे. कुणाकडूनच काही ठोस उत्तर मिळत नसल्यामुळे वृत्तपत्रांच्या बातम्या आणि सरकारचे निर्णय याकडेच सर्वाचे लक्ष लागले असते.

**संशोधनाची आवश्यकता** :

सद्या संपूर्ण मानव समाज एका अनिश्चित आणि बिकट परिस्थितीला सामोरे जातो आहे. २०२० वर्ष फक्त स्वत:ला जगविण्याचे वर्ष आहे हे जो तो सांगतो आहे. सारेच काही एका अनिश्चिततेच्या वळणावर उभे आहे. संपूर्ण जगाचे अर्थचक्र असो वा समाजचक्र सारे काही प्रभावित झालेले आहे. उद्योगधंद्यापासून तर शाळा, महाविद्यालयांपर्यंत सर्वच क्षेत्राला याचा तडाका पूरता बसला आहे. संपूर्ण समाज एका भितीयुक्त आणि चिंतायुक्त वातावरणात वावरतो आहे. आज जिथे माणूस फक्त जगण्यासाठी धडपडतो आहे तिथे तो या परिस्थितीत इतर गोष्टींचा फारसा विचार पण करणार नाही. परंतु याही परिस्थित एक असाही वर्ग आहे ज्याला पुढे काय होणार अशी चिंता भेडसावत आहे आणि हा वर्ग आहे युवावर्ग. आज महाविद्यालयात अंतिम वर्षात असो अथवा प्रथम, द्वितीय अशा साऱ्याच विद्यार्थ्यांच्या मनात या चिंतेने घर केलेले आहे. महाविद्यालये बंद असल्यामुळे माहिती कुणाला विचाराची असा प्रश्न निर्माण होतो आहे. महाविद्यालयाकडूनही याचे योग्य उत्तर मिळत नाही तेव्हा याचा एक अनावश्यक ताण आणि भिती तसेच भविष्याची चिंता विद्यार्थ्यांना सतावते आहे. तेव्हा याच सर्व गोष्टींचा विचार करून विद्यार्थ्यांच्या समस्यांचे स्वरूपाचे अध्ययन करण्यासाठी या विषयाची निवड करण्यात आली.

**संशोधनाचे उद्दिष्टे** :

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे ठरविण्यात आली.

(१) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक चिंताचे अध्ययन करणे.

(२) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या (मूले व मुली) यांच्या शैक्षणिक चिंताचे तुलनात्मक अध्ययन करणे.

**परिकल्पना** :

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या (मूले व मुली) यांच्या शैक्षणिक चिंतामध्ये सार्थक फरक नाही.

**संशोधन पद्धती** :

प्रस्तुत संशोधनाचे स्वरूप लक्षात घेता या संशोधनासाइी सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला.

**न्यादर्श** :

प्रस्तुत संशोधनासाठी चंद्रपूर शहरातील बी.एड. महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची सहेतूक पद्धतीने निवड करण्यात आली. यामध्ये ५० विद्यार्थी आणि ५० विद्यार्थीनी अशा एकुण १०० विद्यार्थ्यांची न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली.

**संशोधनाची साधने** :

सद्य परिस्थितीचे स्वरूप लक्षात घेता संशोधकाने स्वत:हा एका प्रश्नावलीची निर्मिती केली आणि ही प्रश्नावली प्रत्यक्ष न देता ती विविध माध्यमांद्वारे विद्यार्थ्यांना भरावयास देण्यात आली.

**संशोधनाचे परिक्षेत्र, व्याप्ती व मर्यादा** :

प्रस्तुत संशोधनाचे परिक्षेत्र म्हणून चंद्रपूर शहराची निवड करण्यात आली. तसेच प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती ही चंद्रपूर शहरातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक चिंताचे अध्ययन करणे अशी असुन हे संशोधन फक्त बी.एड. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपूरतेच मर्यादित आहे. यात इतर व्यावसायिक अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचा तसेच अन्य विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आलेला नाही.

**संशोधनाचे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन** :

संशोधकाद्वारे निर्मिती प्रश्नावली विद्यार्थ्यांकडून भरून प्राप्त झाल्यानंतर तया प्रश्नावलीचे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थविंचन करण्यात आले.

प्रस्तुत प्रश्नावलीच्या विश्लेषणाकरिता फक्त प्रतिशत/टक्केवारीचा या सांख्यिकीय तंत्राचा वापर करण्यात आला.

**मुख्य निष्कर्ष** :

सांख्यिकीय विश्लेषणातुन प्राप्त झालेले प्रमुख निष्कर्ष पुढीलप्रमाणे –

१. कोविद – १९ च्या प्रभावामुळे एक वर्ष वाया जाण्याचे तसेच भविष्यात काय करायचे असा प्रश्न मुलांच्या मनात निर्माण झाल्याचे आढळून आले.

२. विद्यार्थ्यांनी पदवी नंतर काय करायचे याचे जे नियोजन केले होते ते कुठेतरी आता दुसऱ्या मार्गाने भरून काढावे लागेल असे मत विद्यार्थ्यांनी व्यक्त केले.

३. परिक्षेबाबत अजूनही एक वाक्यता नाही, त्यामुळे विद्यार्थी द्विधा मनस्थितीत असल्याचे दिसून येते.

४. परिक्षा होणार का नाही या चिंतेत बहुसंख्य विद्यार्थी असल्याचे आढळून आले.

५. विद्यार्थ्यांना सद्या परिस्थितीत फक्त वृत्तपत्रे आणि माध्यमे यांच्या द्वारेच जास्तीत जास्त माहिती प्रापत होत असल्याचे दिसून आले. तसेच महाविद्यालयांशी फारसा संपर्क नसल्यामुळे महाविद्यालयाद्वारे फारशी माहिती उपलब्ध होत नसल्याचे दिसून आले. तसेच परिक्षे संदर्भातील सूचना महाविद्यालयाकडून मिळत असल्याचे सूद्धा दिसून आले.

६. ९०% विद्यार्थ्यांना असे वाटते की परिक्षा झाल्या पाहिजे, मात्र त्या कधीही होवो. परिक्षा न देता बहुसंख्य विद्यार्थ्यांना पदवी नको आहे.

७. परिक्षा नाही त्यामुळे निकाल नाही, आणि निकाल नसल्यामुळे गुणपत्रिका तसेच टी.सी. नाही. त्यामुळे पुढे काही करतो म्हटले तर अडचण निर्माण होत आहे असे दिसून येते.

८. भविष्यात काय होणार याबाबत सर्वच विद्यार्थ्यांमध्ये चिंता दिसून येते.

९. परिक्षा न घेता पदवी बहुसंख्य म्हणजेच जवळपास सर्वच विद्यार्थ्यांना नको आहे. परिक्षा आणि मूल्यमापण झालेच पाहिजे असे बहुसंख्य विद्यार्थ्यांना वाटते.

१०. मूले आणि मुली यांच्या शैक्षणिक चिंतामध्ये फारसा फरक आढळून आला नाही.

## संदर्भ ग्रंथ सूची :

१. भिंताडे, वि. रा. (२००६), "शैक्षणिक संशोधन पद्धती"

२. बापट, भा. गो. (१९७५), "शैक्षणिक संशोधन पद्धती"

३. दांडेकर, वा. ना. (२०००), "शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र"

४. मुळे रा.ं.श. आणि उमाटे, "आजचे शिक्षण आजच्या समस्या", श्री विद्या प्रकाशन, पुणे.